या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार १३ ऑगस्ट २०२४ | अंक२४७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# एकत्र बसण्याची गरज काय?, शरद पवार यांच्या आवाहनाला मनोज जरांगे यांचा विरोध; तिढा वाढणार?

## मनोज जरांगे काय म्हणाले?

अहमदनगर जिल्ह्यातील मराठा ताकदीनं एकत्र आला आहे. मराठा समजाचे मनापासून आभार... छगन भुजबळ गप्प बसणार नाही. देवेंद्र फडणवीस हे छगन भुजबळांना बोलायला लावणारच आहे. नारायण राणे आणि मराठा आमदारांची इच्छा बोलायची नसते. पण देवेंद्र फडणवीस कोणालाही गप्प बसून देत नाही. 29 तारखेला मराठे विधानसभेला उभं राहीयाचं की नाही हे ठरवतील. मी कुणालाही भेट असतो. माझ्याकडे कुणी आलं तरी मी भेट असतो, असं म्हणत मनोज जरांगेंनी निलेश घायवळला भेटल्यावर खुलासा केला आहे.

माध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी मराठा आरक्षणाबाबतची भूमिका मांडली. मनोज जरांगे, मराठा समाजाचे नेते आणि ओबीसी समाजाच्या नेत्यांची एकत्र बैठक झाली पाहिजे, असं मुख्यमंत्र्याना सुचवल्याचं शरद पवार म्हणाले. शरद पवार यांच्या याच विधानाला मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी विरोध दर्शवला आहे. शरद पवार यांनी केलेल्या आवाहनाला मनोज जरांगे पाटील यांनी विरोध केला आहे. एकत्र बसण्याची गरज काय?



सरकारला माहिती आऱक्षण कसं द्यायचं ते देत नाहीत. चर्चा करून हा नाही तो नाही आला, मग ढकलाढकली कधीपर्यंत करायची. चर्चेला बसण्याची गरज काय आहे?, असं मनोज जरांगे म्हणालेत.

## शरद पवार काय म्हणाले होते?

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज पुण्यात बोलताना मराठा आणि ओबीसी समाजात आरक्षणाच्या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या तेढ प्रसंगावर भाष्य केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट झाली तेव्हा सर्वपक्षीय बैठक घेण्याबाबत सुचवल्याचं ते म्हणाले. आरक्षणाच्या प्रश्नावर एकदा सर्वपक्षीय बैठक झाली पाहिजे. आम्हीही विरोधी पक्ष म्हणून हजर राहू, असं मुख्यमंत्र्यांनी मी सूचवल्याचं केरे यांना सांगितलं. पण त्यांना वाटतात त्या महत्त्वाच्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना बोलावतात. मनोज जरांगे यांना बैठकीला बोलवावं. त्याशिवाय ओबीसी नेत्यांनाही बैठकीला बोलावलं पाहिजे. त्या संयुक्त बैठकीत चर्चा करून मार्ग काढूयात, असं शरद पवार आज सकाळी पुण्यात म्हणाले. त्यावर मनोज जरांगेंनी उत्तर दिलंय.



# डॉ बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांतीयोजना २०२४-२५ साठी ऑनलाइन अर्ज करा डॉ हरिदास शेलार

**पाटोदा प्रतीनिधी..**

।

राज्यातील अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करून जीवन मान उंचावण्यासाठी अशा शेतक-यांना शेती अर्थसहायासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना सन २०२४- २५ साठी राबविण्यात येत आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज agriwell. mahaonline.gov.in Maharashtra . तरी नजिकच्या आपले सरकार सुविधा केंद्र, महा ई सेवा केंद्रावर अर्ज करावेत. या योजनेत अंर्तभूत घटक नविन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळयाचे प्लास्टिक आस्तरीकरण तसेच इतर बाबींमध्ये वीज जोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच, ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच, परसबाग, पंपसंच (डिझेल/ विद्युत), पीव्हीसी / एचडीपीई पाईप. * सुक्ष्म सिंचन संच यामध्ये ठिबक सिंचन संच व तुषार सिंचन संच यासाठी प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना/बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनांच्या अभिसरणातुन ९०% अनुदान देण्यात येणार आहे. आवश्यक कागदपत्रे- १) जातीचे प्रमाणपत्रे २) ७/१२,८ अ उतारा (०.४० ते ६.० हे) मधील ३) आधार कार्ड ४) आधार संलग्न बँक खाते ५) १५०,००० च्या आतिल सन २०२३-२४ चा तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला ६) ग्रामसभा ठराव ७) प्रस्तावातील इतर आवश्यक प्रमाणपत्र. ज्या शेतक-यांनी यापुर्वी केंद्र/राज्य/ जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेतुन नविन सिंचन विहीरीचा लाभ घेतलेला नाही. अशा शेतक-यांनी नविन विहीरीसाठी व ज्या शेतक-यांनी लाभ घेतलेला आहे आशा शेतक-यांनी इतर बाबीसाठी ऑनलाईन अर्ज करावेत, असे अवाहन डॉ हरिदास शेलार यांनी केले आहे

# ऊसतोड कामगाराचा मुलगा झाला फौजदार आई-वडिलांच्या कष्टाचे केले सार्थक

**अंबाजोगाई प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील डोंगराच्या कुशीत वसलेले अंबलवाडी या गावातील ऊसतोड कामगार रंभाजी गर्जे व अनुसया गर्जे या विठू माऊलीच्या पोटी जन्मलेल्या मुलाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या घेण्यात आलेल्या 2022 परीक्षेमध्ये अभूतपूर्व यश मिळवून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्याचे काम मुलगा गर्जे नितीन रंभाजी यांनी पूर्ण केले. अतिशय गरिबीमध्येही आपल्या मुलांचे शिक्षण खेड्यापाड्यांमध्ये



पूर्ण करण्यासाठी ही अहोरात्र कष्ट करून करून मुलाला शिकवले याचे सार्थक त्यांच्या डोळ्यात दिसले व जीवनाचे सार्थक झाले.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण नंदागौळ या ठिकाणी आजी आजोबा व मामा श्री वैजनाथराव गीते यांच्या सहकार्याने आपले शिक्षण पूर्ण केले त्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण पाटोदा तालुक्यातील डोंगराच्या कुशीत वसलेले जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नाळवंडी या विद्यालयात आपल्या मामाच्या सहकार्याने गावामध्ये पूर्ण केले. पुढे आर्थिक अडचणी अनंत असतानाही या अडचणींवर मात करून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक यामधून पदवी शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचे सार्थक करण्याच्या हिशेबाने अहोरात्र अभ्यास करून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्याच्या इच्छेने कष्टाने पुणे येथे स्वतःच्या उदरनिर्वाहाचे साधन तयार करून अहोरात्र अभ्यास करू महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या घेण्यात आलेल्या 2022 पीएसआय परीक्षेमध्ये 103 रँक ने यश संपादन केले. या अभूतपूर्व यशामुळे या डोंगरदऱ्यातील विद्यार्थ्यांचे परिसरामध्ये लोकांनी कौतुक केले व पुढील कार्यास

## ॲड. प्रतिक केराम यांच्या वाढदिवसा निमत्त शालेय साहित्य वाटप



**किनवट: संतोष मरस्कोल्हे**

मित्रमंडळाच्या वतीने एज्यू'ट्री' शैक्षणिक केंद्राच्या मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी प्रा. सुशिल कदम, गजानन मादेवार, राजश्री अंकमवार, नारायन चव्हाण, राजु दिसेवार, पल्लवी मोदुकवार, ऋतुजा ताटे, पालक व विद्यार्थी उपस्थित.

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : जागतिक आदिवासी दिन आणि युवा नेते ॲड. प्रतिक भीमराव केराम यांच्या वाढदिवसानिमत्त एज्यू'ट्री'च्या विद्यार्थ्यांना संतोष मरस्कोल्हे मित्रमंडळ यांच्या वतिने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आशिर्वाद वासरके, प्रमुख उपस्थिती संदेश भीमराव केराम प्रमुख पाहुणे माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, संतोष मरस्कोल्हे, प्रा. सुशिल कदम, गजानन मादेवार, राजश्री अंकमवार, नारायन चव्हाण, राजु दिसेवार, पल्लवी मोदुकवार, ऋतुजा ताटे, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# आष्टी पाटोदा शिरूर कासार विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाने लढवावी भास्कर केदार यांची काँग्रेस पक्ष श्रेष्ठींकडे मागणी

**शिरूर कासार।प्रतिनिधी**

अवघ्या दोन महिन्यावर विधानसभेच्या निवडणुका येऊन ठेपलेल्या आहेत त्या पार्श्वभूमीवर लातूर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या वतीने आढावा बैठक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथलाजी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले , विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात , विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार , विधान परिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील , आ.अमित विलासराव देशमुख ,आ.धीरज विलासराव देशमुख ,आदी वरिष्ठ नेत्यांकडे यांच्या उपस्थितीत आणि खा. रजनिताई पाटील . माजी मंत्री अशोकराव दादा पाटील बीड जिल्हा अध्यक्ष राजेसाहेब देशमुख जिल्हा उपाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाल काँग्रेस पक्षाने आष्टी पाटोदा शिरूर कासार या विधानसभा मतदारसंघाची जागा लढवावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्याकडे काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा सरचिटणीस भास्कर केदार यांनी केली यावेळी उपस्थित जिल्ह्यातील सर्व तालुका अध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटीचे सर्व पदाधिकारी क्रिएंटल सेलचे सर्व जिल्हाध्यक्ष त्यांची सर्व तालुका अध्यक्ष उपस्थित होते त्याप्रसंगी



पक्षाचे प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुका जिंकण्यासाठी पूर्ण ताकतीने कामाला लागण्याचे आवाहन केले आहे त्याप्रसंगी उपस्थिती होते

